
Peer reviewed Journal    Impact Factor:7.265    ISSN-2230-9578

# Journal of Research and Development




*Multidisciplinary International Level Referred Journal*






Chief Editor
Dr. R. V. Bhole
'Ravichandram' Survey No-101/1, Plot
No-23, Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102

Editor

**Dr. M.N. Kolpuke**
Principal,
Maharashtra Mahavidyalaya, Nilanga, Dist. Latur

**Dr. V.D. Satpute**
Principal,
Late Ramesh Warpudkar College, Sonpeth, Dist. Parbhani



**Address**
'Ravichandram' Survey No-101/1, Plot,No-23,Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102

| | | |
|---|---|---|
| 38 | दळण वळण नवीन सुधारणा एक विचार प्रवाह<br>**श्रीकांत गव्हाणे** | 141-143 |
| 39 | महिला उद्यमिता<br>**डॉ सुरेखा पिपलानी** | 144-146 |
| 40 | आंबेडकरोत्तर काळातील आंबेडकरवादी चळवळी<br>**प्रा.डॉ. बी.एम. काळे** | 147-151 |
| 41 | मोगलकालीन कृषी व्यवसायाचा ऐतिहासिक दृष्टीकोण<br>**पवार डी. व्ही.** | 152-154 |
| 42 | भारतातील कौशल्य विकास व योजनांचा चिकित्सक अभ्यास<br>**प्रा.पांचाळ विजय किशनराव** | 155-157 |
| 43 | स्त्री आणि पुरूषांमधील सामाजिक योगदान आणि भावनिक कार्यकुशलता या घटकांचा तुलनात्मक अभ्यास.<br>**शितल भागवत जाधव प्रा.डॉ.रमेश पठारे** | 158-162 |
| 44 | उद्योजक आणि महिला उद्योजकांची वाटचाल<br>**डॉ. कु. धुतमल वर्षा सिताराम** | 163-165 |
| 45 | आधुनिक हिन्दी साहित्य में नारी<br>**प्रा. डॉ. वडवकर एस.ए.** | 166-168 |
| 46 | बँकींग क्षेत्रातील सुधारणा<br>**प्रो.डॉ.एम.डी.कच्छवे** | 169-173 |
| 47 | नागरी सहकारी बँकांचा पूर्व इतिहास आणि सद्यस्थिती<br>**प्रा. डॉ.अरूण बळीराम धालगडे सय्यद फारुखअली जहूरअली** | 174-176 |

# नागरी सहकारी बँकांचा पूर्व इतिहास आणि सद्यस्थिती

**प्रा. डॉ.अरूण बळीराम धालगडे[1] सय्यद फारुखअली जहूरअली[2]**

[1]संशोधक मार्गदर्शक, सहयोगी प्राध्यापक व वाणिज्य विभाग प्रमुख महाराष्ट्र महाविद्यालय निलंगा जि.लातूर.

[2]पीएच.डी. संशोधक, महात्मा गांधी महाविद्यालय, अहमदपूर. जि. लातूर.

Email- abdhalgade@gmail.com

Email- sayyedsirmgm@gmail.com

**प्रस्तावना :** सहकारी बँकिंग हा राज्याच्या अर्थव्यवस्थेचा आणि राजकारणाचाही कणा आहे महाराष्ट्र सहकारात कायमच आघाडीवर राहीला. आजही महाराष्ट्रातच सर्वाधिक सहकारी बँका आहेत. सहकारी बँका मुळे बँकिंग क्षेत्र खऱ्या अर्थाने तळागाळापर्यंत पोहोचले. जिल्हा, तालुका, गाव स्तरावर सहकारी बँका उभ्या राहिल्या. सहकारी साखर कारखाने उभे राहिले. अनेक राजकीय नेते सहकाराच्या आधारानेच मोठे झाले. अगदी मुख्यमंत्री पदापर्यंत पोहोचले. सहकारी क्षेत्र टिकून राहिले पाहिजे यासाठी राजकारणातील भांडणे सहकारात येऊ नयेत अशीच भूमिका आजवर घेतली गेली आहे. महाराष्ट्राच्या स्थापनेची 62 वर्ष पूर्ण होत असताना, म्हणूनच सहकारी बँकांच्या वाटचालीचा सद्यस्थितीचा आढावा घेणे आवश्यक आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे**

1)भारतातील नागरी सहकारी बँकांचा अगोदर चा व सद्यस्थितीचा अभ्यास करणे.

2) रिझर्व बँकेला सहकारी बँकामध्ये जादा अधिकार मिळाल्यामुळे होणाऱ्या फायदे व तोट्याचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती**

हा संशोधन लेख लिहिण्यासाठी द्वितीय सामग्रीचा अवलंब करण्यात आलेला आहे. यामध्ये प्रामुख्याने विविध संदर्भ ग्रंथ, शासनाचे अहवाल, वर्तमानपत्रातील लेख, इंटरनेट इत्यादी साधनांचा आधार घेण्यात आलेला आहे.

**सहकारी बँकांचा इतिहास**

सहकारी बँकिंगची भारतातील सुरुवात एकोणिसाव्या शतकाच्या अखेरच्या टप्प्यात सुरू झाली. ब्रिटन, जर्मनी व अल्पप्रमाणात इटलीमधील सहकारी चळवळींची कामगिरी पाहून भारतातील मध्यम व कनिष्ठ वर्गातही ही चळवळ योग्य दिसेल या विचाराने चळवळीची सुरुवात झाली, असे म्हटल्यास हरकत नाही. भारतातील तत्कालीन व्यापारी बँका मध्यम आणि समाजाच्या कनिष्ठ स्तरावर कर्जे देण्यास फारशा उत्सुक नव्हत्या. शिवाय वैयक्तिक जामीनकीवर कर्ज वाटप करण्यास या बँका अजिबात तयार नव्हत्या; त्यामुळे गरजू वर्गासमोर सावकाराकडे जाऊन भरमसाठ व्याजाने कर्ज घेण्यात व्यतिरिक्त अन्य कोणताही पर्याय उपलब्ध नव्हता. बडोदा संस्थानमध्ये 'म्यूच्यूअल एड फर्स्ट सोसायटी' म्हणून 1889 मध्ये विठ्ठल लक्ष्मण कवठेकर यांच्या मार्गदर्शनाखाली 'अन्योन्य सहकारी मंडळी' या नावाने संस्था सुरू झाली. मध्यम व कनिष्ठ स्तरावर ठेवी गोळा करून याच स्तरावरील गरजूंना कर्ज वाटप करण्याचे काम मोठ्या उत्साहात सुरू झाले. ही संस्था अनेक वर्ष कार्यरत होती.

पुढची अत्यंत महत्त्वाची घटना म्हणजे 1904 मध्ये भारत सरकारने पहिल्यांदा को-ऑपरेटिव्ह सोसायटी कायदा मंजूर केला त्यामुळे भारतामध्ये अशा सहकारी तत्त्वावरील संस्था सुरू करण्यास उत्तेजन मिळाले. कायद्यान्वये भारतामधील पहिली सोसायटी तत्कालीन मद्रास प्रांतातील कांजीवरमम मध्ये ऑक्टोबर 1904 मध्ये स्थापन झाली. पाठोपाठ मुंबई, पुणे, कर्नाटकातही काही ठिकाणी अशा संस्था स्थापन झाल्या. रिझर्व बँकेने 1958-59 मध्ये सहकारी बँकांचा सखोल अभ्यास करून 1961 मध्ये अहवाल प्रसिद्ध केला. याचा परिपाक म्हणून रिझर्व्ह बँकेने 1 मार्च 1966 पासून एक लाखापेक्षा अधिक भागभांडवल असलेल्या सहकारी बँकांना' बँकिंग रेगुलेशन ॲक्ट 1949' खाली आणून खऱ्या अर्थाने दुहेरी नियंत्रण सुरू केले. यानुसार बँकिंगमधील विषय, लायसनिंग, एरिया ऑफ ऑपरेशन, इंटरेस्ट रेट्स इत्यादी रिझर्व बँकेच्या, तर रजिस्ट्रेशन, मॅनेजमेंट, ऑडिट, लिक्विडेशन सारखे नियम संबंधित

**आव्हाने व भविष्य**

येणाऱ्या काळात रिझर्व बँक वरील सर्व बाबीकडे तसे पाहते आणि वटहुकुमाने मिळालेले अधिकार कसे कसे वापरते ते पहावे लागेल. नव्या अध्यादेशामुळे रिझर्व बँकेला जादा अधिकार प्राप्त होणार आहेत रिझर्व बँकेला एखाद्या संचालक मंडळावर किंवा संचालकावर थेट कारवाई करता येईल यापूर्वी रिझर्व बँकेला सहकार आयुक्तांमार्फत अहवाल मागून कारवाई करता येत होती परंतु आता राज्यातील सहकारी बँका बाबत सहकार आयुक्तांशी केवळ सल्लामसलत होणार आहे. छोट्या-छोट्या नागरी सहकारी बँकांना आपल्या कारभारात अधिक व्यावसायिकता आणणे आवश्यक ठरणार आहे कारण असे न केल्यास न झाल्यास अशा बँकांचे सक्तीने विलीनीकरण अन्य मोठ्या सहकारी बँकेत करण्याचे अधिकार रिझर्व बँकेला या वटहुकूमामुळे मिळाले आहेत. ठेवीदारांच्या ठेवी या सर्वातून अधिक सुरक्षित होतील हे जरी वास्तव असले तरीही नागरी बँकांची देशातील संख्या तीन आकडी होण्याची शक्यता जाणवत आहे राज्यांच्या अगर भारत सरकारच्या सहकार विभागातील अज्ञानी अधिकाऱ्यांचे अधिकार रिझर्व बँकेसारख्या तज्ञ व मध्यवर्ती नियंत्रकाकडे आले ही आशादायक घटना आहे मात्र सहकारी अस्तित्व कायम राहिले पाहिजे तरच मध्यम व तळागाळाच्या गरजूंना आपल्या गरजा सुलभ रीतीने भागविता येतील.

**रिझर्व बँकेच्या नियंत्रणामुळे फायदे तोटे**

1)नागरी सहकारी आणि मल्टीस्टेट बँकांमध्ये आर्थिक शिस्त येईल.

2) ठेवीदारांच्या ठेवी सुरक्षित राहण्यासाठी मदत होणार.

3) दोषी संचालकावर आरबीआयकडून थेट कारवाई.

4) राज्यातील सहकार आयुक्त आणि केंद्रीय सहकार आयुक्तांच्या अधिकारावर मर्यादा.

5) सहकारी बँकिंग क्षेत्राची तत्वे संपुष्टात येण्याची भीती.

6) असुरक्षित कर्ज वाटपावर प्रतिबंध.

**निष्कर्ष:**

देशातील नागरी सहकारी बँका वर रिझर्व बँकेचे नियंत्रण पूर्वीपासूनच आहे परंतु केंद्र सरकारच्या अध्यादेशामुळे रिझर्व बँकेला जादा अधिकार प्राप्त होणार आहेत त्यामुळे सहकारी बँकांमध्ये शिष्य होऊन ठेवीदारांच्या ठेवी सुरक्षित राहतील परंतु सहकारी बँकिंग क्षेत्राला व्यापारी बँकांचे स्वरूप प्राप्त होऊन सहकारी बँकिंग क्षेत्र संपुष्टात येण्याची शक्यता आहे त्यामुळे रिझर्व बँकेचे सहकारी बँकावर नियंत्रण असले पाहिजे परंतु सहकाराची तत्वे अबाधित राखूनच.

**संदर्भ ग्रंथ**

1)भोसले व काटे (2002) सहकाराचा विकास, चैतन्य प्रकाशन, नाशिक.

2) सुधाकर मानकर (2006) सहकार, निराली प्रकाशन, पुणे.

3) महाराष्ट्र टाइम्स 2 ऑगस्ट, 2020.

4) इ. सकाळ 18 मार्च, 2022.